सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**
**साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे 411 005**
**दूरध्वनी क्र.** 020-25538042/43 **Email Id:commsugar.byprod@gmail.com**

---

**जा.क्र.साआ/उपप/कक्ष-12/साखर विक्री/8/2021** **दि.** 10/02/2021

**वाचावे :**

1. केंद्र शासनाच्या खाद्यान्न व सार्वजनिक वितरण विभागाचे दि.5/2/2021 रोजीच्या सूचना

**-: परिपत्रक :-**

**विषय :- हमी भावापेक्षा कमी दराने साखर विक्री केल्यास व दरमहा साखर कोटा मर्यादेचे उल्लंघन केल्यास कडक कारवाई करणेबाबत.**

देशांतर्गत अतिरीक्त झालेल्या साखरेच्या उत्पादनाचे व्यवस्थापन व्हावे, साखरेची किंमत देशांतर्गत बाजारपेठेत स्थिर व्हावी तसेच ऊस उत्पादकांना FRP प्रमाणे कारखान्यांकडून दर मिळावा याकरीता केंद्र शासनाने शुगर केन (कंट्रोल) ऑर्डर, 2018 नुसार, दि.14/02/2019 रोजी साखर विक्रीची किमान आधारभूत किंमत रु.3100/- प्रति क्विंटल निश्चित केलेली आहे. तसेच बाजारातील साखरेचा मागणी-पुरपवठयातील समतोल साधण्याकरीता खुल्याबाजारात प्रत्येक कारखान्याने किती साखर विक्री करावी यासाठीचा साखर विक्रीचा दरमहा कोटा ठरवून दिलेला आहे..

देशांतर्गत बाजारपेठेत किमान विक्री दरापेक्षा कमी दराने साखरविक्री करु नये तसेच केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या कारखान्याच्या दरमहा साखर विक्री कोटा आणि साखर साठा या दोन्ही मर्यादांचे उल्लंघन करणेत येऊ नये अशा सूचना संदर्भातील निर्देशानुसार केंद्र शासनाकडून निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार, साखर कारखान्याने दरमहा साखरेची विक्री स्थानिक बाजारपेठेत हमी भावापेक्षा कमी दराने होणार नाही याची दक्षता घ्यावी. तथापि वरील बाबींची अंमलबजावणी न करणे म्हणजे शासनाच्या साखरेचे दर स्थिर ठेवण्याच्या धोरणाचे उल्लंघन आहे. तसेच केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या कोटयापेक्षा अधिक साखर विक्री केली जाणार नाही, याची पुरेपूर काळजी घ्यावी. शुगर केन (कंट्रोल) ऑर्डर 1966 मधील तरतूदींचे उल्लंघन निदर्शनास आल्यास फौजदारी गुन्हे दाखल केले जातील याची कृपया नोंद घ्यावी.

सदर सूचनांचे साखर कारखान्यांनी पालन न केल्यास संबंधित कारखान्यांवर कारवाई केली जाईल आणि याबाबतचा अहवाल केंद्र शासनास कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी. यासंदर्भात राज्यातील पोलीस विभागास देखील योग्य ती दखल घेणेबाबत सूचना देण्यात येत आहेत.

**सोबत - केंद्र शासनाच्या खाद्यान्न व सार्वजनिक वितरण विभागाचे दि.5/2/2021 रोजीच्या सूचना.**

**(शेखर गायकवाड)**
**साखर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**
**चेअरमन/ कार्यकारी संचालक, साखर कारखाने, (सर्व)**

**प्रत-**
**1. जिल्हाधिकारी, (सर्व)**
**2. पोलीस अधिक्षक, (सर्व)**
3. अपर आयुक्त (वस्तु व सेवाकर), मुंबई/ नाशिक/पुणे/ कोल्हापूर/औरंगाबाद/नागपूर

**प्रत माहितीस्तव व योगय त्या कार्यवाहीस्तव-**
1.प्रादेशिक सहसंचालक (साखर), सर्व -

**यांना कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांनी केंद्र शासनाच्या संदर्भिय पत्राची योग्य ती दखल घेऊन दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल असे पहावे आणि सूचनांचे उल्लंघन करणा-या कारखान्यांचा अहवाल साखर आयुक्तालयास व केंद्र शासनास दरमहा कळविण्यात यावा.**